Vol 3 Issue 8 Sept 2013

ISSN No : 2230-7850

Monthly Multidisciplinary
Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor

Ashok Yakkaldevi

Editor-in-chief

H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Research Journal
Volume-3, Issue-8, Sept-2013
ISSN 2230-7850

Available online at www.isrj.net

# वसंतराव नाईक यांचे राजकीय योगदान

**व्ही. आर पवार , डी. एस. कळंबे**

जे. ई.एस. महाविद्यालय जालना महा.

मोरेश्वर महाद्यिालय भोकरदन ता. भोकरदन जि. जालना महा

***सारांश :*** व्यक्तीच्या प्राथमीक जडणघडणीमध्ये कुटुंबाचा गावाचा मोठा वाटा असतो. व्यक्तीचा व्यवसाय, सामाजिक दर्जा, नाते संबंध धार्मिक आधार, अंधश्रध्दा, यावर त्यांच्या कुटुंबातील संस्काराचा मोठा प्रभाव असतो. बंजारा समाज हा तसा पुर्वीपासूनच मागासलेला व डोंगर द–यात भटकंती करीत आपली उपजिविका करणारा समाज म्हणून ओळखला जातो. आपल्या दैनंदिन गरजा पुर्ण करण्यासाठी भारतात भ्रमण करीत असल्याने कारणाने शिक्षणापासून वंचित असलेला हा समाज महात्मा ज्योतिबा फुले यांच्या शैक्षणिक चळवळीमुळे प्रभावीत झाला  शिक्षणामुळे व्यक्तिचा विकास होतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकराची उत्तुंग भरारी त्यांनी पाहिली विद्येविना किती अनर्थ होतो हे उमजल्यामुळे गहुली तांडा जि. यवतमाळ येथील फुलसिंग नाईकांने आपल्या मुलाला शिकवण्याचे ठरवले बंजारा समाजात प्रथम पदवीधर होण्याचा मान ज्यांना मिळला ती व्यक्ती म्हणजे वसंतराव नाईक होय.याच नाईकाने महाराष्ट्राच्या राजकारणात राहून अखंडपणे एकदा नव्हे तर तीन वेळेस 1963 1967 1972 मुख्यमत्रीपदी बिनविरोध निवड होण्याचे भाग्य वसंतरावाच्या वाटयाला आले. महाराश्ट्रचे सर्वाधिक काळ सलग सव्वा अकरा वर्श 5 डिसेबर 1963 ते 19 फब्रुवारी 1975 मुख्यमंत्री राहण्याचे भाग्य त्यांना मिळाले पण या भाग्यापेक्षाही वसंतराव नाईक यांच्या कर्तृत्वाचा नेतृत्वाचा आणि उमद्या मनाचा वाटा सगळयात जास्त आहे

***प्रस्तावना :***

***वसंतराव नाईकांचे व्यक्तिमत्व :*** अशा हया अजातशत्रू बहुआयामी व्यक्तिमत्व लाभलेल्या वसंतराव नाईकांचा जन्म 1जुलै 1913 रोजी बंजारा समाजातील एका शेतकरी कुटुंबात झाला गहुली ता.पुसद जि.यवतमाळ येथे झाला त्यांच्या वडीलांचे नाव फुलसिंग नाईक व अजोबा चतुरसिंग नाईक होते. त्यांच्या अजोबांनी वेगवेगळया ठिकाणी असलेल्या बंजारा समाजाला एकत्र केले व गहुली हे गाव वसवले एकूणच बंजारा समाजाला स्थिर  जिवन प्राप्त करून दिले ते त्या समाजाचे नाईक पुढारी झाले.तेंव्हापासून त्यांचे राठोड हे  आडनाव जाउन नाईक हयाच नावाने ते ओळखले जाउ लागले. या समाजकार्याचा वसा पुढे फुलसिंग नाईक यांनी चालु ठेवला याचा अर्थ असा होतो की,मुळातच सामाजिक जाणीव असलेली कौटुंबीक पार्श्वभुमी वसंतराव नाईकांना मिळाली चांगल्या पध्दतीने शिक्षण घेउन 1940 साली कायदयाची पदवी संपादन केली. नाईकांवर महात्मा फुले यांच्या विचासरणीचा जबरदस्त प्रभाव होता. तसेच ते महात्मा गांधी,पंडित नेहरू,डॉ. बाबासाहेब आंबेडकर , व डॉ.पंजाबराव देशमुख, यांच्या विचारसरणीने व समाजसेवेने ते भारावून गेले होते.

वसंतराव नाईक वृत्तीने रसिक हौशी व समाजात मिळून मिसळून वागणारे स्वभावाने शांत संयमी होते.त्यांच्या अंगी चिकाटी हेती.एखादे काम हाती घेतले की, ते चांगल्या पध्तीने पुर्णत्वास नेण्याचे कसब त्यांची अंगी होते. राजकीय स्तरावर ते अनेक क्रांतीकारक योजना राबण्यिात ते यशस्वी झाले.

***पंचायतराज व्यवस्थेतील वसंतराव नाईकांचे योगदान :*** बलवंतराय मेहता समितीनेदेशात सत्तेच्या विकेंद्रिकरणाची योजना आणली आणि 1962 मध्ये त्याचा भव्य प्रयोग महाराश्ट्रात केला नंतरच्या बारा वर्शात त्या योजनेची  पायाभरणी भक्कम करण्यात आली व पंचायत समिती आणि जिल्हा परिशद यांच्या कामाला आजचे वळण देण्यात त्यांचा वाटा मोलाचा होता. महाराष्ट्राच्या ग्रामिण कार्यकर्त्यांशी याच कामामुळे त्यांचे संबंध दृढ झाले व खेडयांना विश्वासाचा सोबती मिळाला व पंचायतराज संकल्पनेची प्रभावी अंमलबजावणी केली.त्याकाळात महसुलमंत्री वसंतराव नाईक यांच्या अध्यक्षतेखाली लोकशाही विकेंद्रीकरण समितीला मुर्त रूप देण्याचे काम कार्य केले. 15 महिन्याच्या सातत्यपुर्ण अभ्यासातून त्यांनी आपला अहवाल सादर केला. आज महाराष्ट्रात अस्तित्वात असलेल्या लोकशाही विकेंद्रीकरणाचे मुळ या अहवालात आहे. या अहवालावरून महाराष्ट्र पंचायत समिती व जिल्हा परिषद कायदा अस्तित्वात आला. जिल्हा परिषदेचा अध्यक्ष जिल्हाधिकारी न राहता तो जनतेनी निवडून दिलेला प्रतिनिधी असावा.ही त्यांची शिफारस क्रांतीकारक स्वरूपाची होती.ग्रामिण भागातील नेतृत्वाचा निर्णय प्रकीयेत मोठा वाव असला पाहिजे. ही त्यामागची भुमिका होती.सत्तेच्या विकेंद्रीकरणाचे हे मॉडल देशभर स्वीकारले गेले.त्यामुळे सत्तेचया विकेंद्रीकरणाचे श्रेय महाराष्ट्राबरोबर  वसंतराव नाईकांना देखील आहें.''

***वसंतराव नाईक आणि हरितक्रांती:***

1942 च्या आंदोलनानंतर वसंतराव नाईकांनी राजकीय क्षेत्रात पदार्पण केल्यानंतर 1943 वर्षाच्या नगराध्यक्ष पदापासून ते 1975 मुख्यमंत्री पदापर्यंत मजल मारत त्यांनी विशेषतः कृर्षी क्षेत्रात महान कामगिरी केली. शेतक–याची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी त्यांनी आपल्या कारकीर्दीत अन्नधान्य,शेती, ज्वारी,व भात एकाधिकार योजना,रोजगाार हमी योजना, इत्यादी महत्वाच्या योजना राबवून कृर्षी क्षेत्राचा चेहरामोहराच बदलून टाकला 'एका वर्षात राज्याचा अन्नधान्याच्या क्षेत्रातला अनुशेष संपविला नाही तर मला फासावर चढवा' अशी घोषणाच त्यांनी पुण्याच्या जाहीर सभेत केली. त्या वर्षात व नंतरच्या काळात महाराष्ट्रात शेती व सिंचनाच्या क्षेत्रात त्यांनी जे आतोनात परिश्रम घेतले त्याचा परिणाम हे राज्य सुजलाम, सुफलाम,होण्यात झाला. शेतकरी हा राष्ट्राचा कणा आहे. तो सुखी –समृध्द झाल्याशिवाय राष्ट्राची प्रगती व विकास होणार नाही असी विचारसरणी असलेल्या वसंतरावांना'' शेतकरी कारखानदार झाला पाहिजे असे त्यांचे मत होते. ,,[3]

***राजगार हमी योजना :*** 1970 ते 1973 या कालावधीत सतत तीन वर्ष दुष्काळ पडला.प्रदीर्घ दुष्काळावर मात करण्याचे आव्हान त्यांनी स्वीकारले. 50 लक्ष दुष्काळपीडीत शेतक–यांना व भुमिहीन मजुरांना उत्पादक रोजगार पुरवण्याच्या योजना त्यांनी अंमलात आणल्या.दुष्काळी वर्शात केलेल्या या याजनेतून आज प्रचलित असणारी रोजगार हमी याजना ही वसंतरावांच्या द्रष्टेपणाची साक्ष आहे. मागेल त्याला काम या राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्वावर अद्धितीय योजनेची आखणी त्यांनी केली. त्यांनी मागेल त्याला काम देणारी अशी रोजगाार हमी योजना ही अभुतपुर्व कल्पना प्रत्यक्षात आणण्याचे महत्वपुण कार्य हाती घेउन राज्यातील लाखो अल्पभुधारकांच्या हातांना हक्काचे काम देणारी ही योजना होती.आज त्यामुळे शेतक–याना व शेतमजुरांना त्याचा  फायदा मिळत आहे.याजना यशस्वीपणे राबविण्यासाठी वसंतरावांनी अहोरात्र परिश्रम केले.स्त्री आणि पुरूषांना समान मजुरी होती काम करणा–या महिलांच्या लहान मुलांना सांभाळण्यासाठी निवारा ही या योजनेची वैशिष्टये होती. रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून राज्यभर मोठे काम निर्माण झाले.महाराश्ट्रातील कष्टकरी शेतमजुराचा स्वाभिमान या योजने ने जागवला आणि दुष्काळी परिथिती असतांना देखील शेतमजुराला वा–यावर न सोडता त्यांना रोजगार मिळवून दिला.त्यांच्या कार्यकाळात दररोज 50लाख लोक काम करत होते. त्यातून 7हजार विहिरी ,860 तलाव 73 हजार इतर विहिरी 2500 ग्रामिण तलाव 365 कि.मी.कॅनल 6 लाख कि.मी.रस्ता 30 लाख एकर शेतीमध्ये बांध घालण्यात आले.हे बंधारे रोजगार हमीमुळे झाले. आज देशाने ही योजना स्वीकारली आहे. जास्तित जास्त शेती सिंचनाखाली आली पाहिजे.त्यांच्या कारकीर्दीत पुश्कळ तलाव दूरूस्त करण्यात आले.''4 घटनेप्रमाने अनूसूचीत जाती व अनुसूचीत जमाती या दोन प्रवर्गांना अनुक्रमे 13, व 7, टक्के जागा राखीव होत्या महाराष्ट्रात भटक्या विमुक्त जातीची संख्या लक्षणीय आहे. त्यांचे जीवनमानही

बेताचेच आहे.हे लक्षात आल्यानंतर त्यांच्या कारकीर्दीत घटनेच्या कलम 16, 4, ब, चा आधार घेउन राज्यात तिसरी सूची तयार करण्यात आली. भटक्या विमुक्त या वंचित घटकासाठी 4 टक्के जागा राखीव ठेवण्याचा निर्णय त्यांचा काळात घेतला. त्यानंतर या वर्गासाठी राज्यात मोठया प्रमाणात आश्रमशाळा सुरू करण्यात आल्या त्यामुळे या समाजाला शिक्षणाची संधी प्राप्त झाली परंतु बंजारा समाजातील शिक्षणाचे प्रमाण हे कमी आल्याचे आढळून येते.

***शेतीसुधारणा :*** महाराष्ट्रात अन्नधान्याचे उत्पादन वाढावे राज्य अन्नधान्याच्या बाबतीत स्वंयपुर्ण व्हावे या एकाच ध्येयाने त्यांना झपाटून टाकले होते. इथला सामान्य माणुस हा शेतीवर निर्भर आहे. म्हणून त्याचे कल्याण आधी व्हायला पाहीजे असे ते म्हणत असे ज्या ठिकाणी जाईल त्या ठिाकाणी शेतीचा प्रचार करीन त्यांचा शेतक–यांच्या शेतीकडे पाहण्याचा दृष्टीकोणच परिवर्तनशील होता त्यांनी राज्यभर दौरे केले. आपल्या अभ्यासपुर्ण अन, अमोघ वाणीने शेतक–यात चैतन्य निर्माण केले आज भरघोस उत्पादन देणारी हिरवी शेती पाहतांना त्यात वसंतराव नाईकांचे प्रतिबिंब दिसते.प्रत्येक दुष्काळाच्या काळामध्ये वसंतराव नाईकंची आठवण करणारे लोकदृष्टीपथास येते.

***मराठीला राजभाषेचा दर्जा:*** 1 मे 1960 रोजी वसंतरात नाईकांनी घोषणा केली आणि 4कोटी लोकांच्या हद,यात असलेल्या मराठीला राजभाषेचा दर्जा मिळाला. राज्यातील शासनाचे कामकाज मराठीतून चालविण्यात यावे असे आदेश देण्यात आले. तसेच राज्यातील इतर भाशा बोलणा–या लोकांची गैरसोय होणार नाही. असा विश्वासही देण्यात आला. नागपूर,पुणे, औरंगाबाद, येथे भाषा संचालनालयाची विभागीय कार्यालये सुरू करण्यात आले.या निर्णयापुर्वी इंग्रजी हे शासनाच्या व्यव्हाराचे माध्यम होते. एक परकीय भाषा माध्यम असल्यामुळे शासन व जनता यांच्यात जवळीक निर्माण करण्याचे काम भाशेच्या माध्यमातून घडून येईल हा ठाम विश्वास या निर्णयामागचा होता[5].''

***ग्रामिण विद्युतीकरण :*** वसंतराव नाईक मुख्यमंत्री झाल्यानंतर महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाची आर्थिक स्थिती मजबूत करण्याचे कार्य त्यांच्या कार्यकाळात करण्यात आले. महाराष्ट्रातील ग्रामिण भागात वीज पोहचविण्याचा चंग बांधला गेला. वीज उत्पादनावर भर देण्यात आला.राज्यात वीजनिर्मिती करण्यासाठी विद्यूत केंद्र स्थापन करण्यात आले. खापखेडा ,पारस, भुसावळ, औष्णीक तर पाफळी येलदरी जलविद्युत हे प्रकल्प उभारले गेले त्याचवेळी विविध महाविद्यालयातून विद्युत अभियांत्रीकीचे शिक्षण मोठया प्रमाणात सुरू केले त्याचा परिणाम असा झाला की,या क्षेत्रात तंत्रज्ञ व कर्मचारी यांची उणीव भासली नाही सुरूवातीला काही मोजक्याच शहरामध्ये विद्युतीकरण झाले होते मात्र ही वीज गावागावात पोहचविण्याचे कार्य त्यांनी पुणे केले त्यामुळे अनेक नवनवीन उद्योगांना चालना मिळाली विजेच्या प्रसारामुळे शेतक–याला कारखान्याचे क्षेत्र उपलब्ध झाले या योजनांमुळे शेती क्षेत्रातील अनेक नव्या संशोधनाला व प्रयोगांना चालना मिळाली व शेतीला पुरक असे नवे उद्योग राज्यात सूरू करण्याचे श्रेय नाईकांना देता.'[6]

***कृर्षी विद्यापीठांची निर्मिती :*** महाराष्ट्रत चार स्वतंत्र कृर्षी विद्यापीठांची स्थापना करण्याचे महान कार्य म्हणजे वसंतराव नाईक यांच्या शेतीविषयक वैज्ञानिक दृष्टीकोणाचा कळस म्हाणावे लागेल.एका राज्यात चार कृर्षी विद्याठिाची स्थापना करणारे ते एकमेव मुख्यमंत्री होय.ही भारताच्या इतिहासातील पहिली घटना म्हणून ओळखली जाते.त्यामुळे शेती आणि शेतक–यावर निस्वार्थपणे प्रेम करणा–या नाईकांचे नाव कृर्षी विद्यापिठाचे शिल्पकार म्हणून नोंदवले गेले.इ.स. 1968 साली राहुरी येथे पहिल्या कृर्षी विद्यापिठाची स्थापना झाली या विद्यापिठात भरघोस फळ पिकांसाठी उपउक्त संशोधन करण्यात येत आहे. आज या विद्यापिठातून डाळिंब या पिकाचे तंत्रज्ञान विकसित करून शेतक–यांना त्याचा भरपुर फायदा होतांना दिसतो या कृर्षी विद्यापिठानंतर अकोला येथे दुस–या विद्यापिठाची मागणी करण्यात आली.या मागणीसाठी अंदोलने केली गेली या मागणीचा स्वीकार करून 1969 या वर्षी अकोला येथे कृर्षी विद्यापिठाची स्थापना करण्याचा निर्णय घेतला त्यानंतर त्याला विदर्भाच्या अमरावती जिल्हयातील केंद्रीय कृर्षीमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख यांचे नाव देण्यात आले.या विद्याशाखांमधून विज्ञान स्थानक नावाची पदवी बहाल करण्यात येते. राहुरी आणि अकोला या नंतर मराठवाडयातील पहिले कृर्षी विद्यापिठ परभणी या ठिकाणी स्थापन करण्याचे कार्य देखील वसंतराव नाईकांनी केले.यातून तृणधान्य व खरीप पिकांचे संशोधन मोठया प्रमाणात होतांना दिसते. वसंतराव नाईक यांच्या जन्मशताब्धी वर्षानिमित्त आता या विद्यापिठाचे नामकरण 'वसंतराव कृर्षी विद्यापिठ ' असे करण्याची घोषणा नुकतीच मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी केली आहे.'[7] या नियोजित नामकरणामुळे वसंतराव नाईक यांच्या कृर्षी स्थापनेच्या कार्याचा गौरव आहे

म्हाराष्ट्रात कृर्षी समाजरचना निर्माण करण्यासाठी सहकारी साखर कारखाने सहकारी सूत गिरण्या अशा प्रकारच्या कृर्षी उद्योगांना त्यांनी सदैव प्रोत्साहन दिले. बंद पडलेल्या कापड गिरण्या सुरू करून हजारो कामगाारांवर आलेले बेकारीचे संकट दूर करण्यास त्यांनी मोठी मदत केली.एकूणच वसंतराव नाईकांची कारकीर्द ही महाराष्ट्रासाठी व महाराष्ट्रातील बंजारा समाजासाठी गौरवास्पद ठरली आहे. कृर्षी,शिक्षण, आरोग्य,रोजगार ,उद्योग, नागरी विकास इत्यादी क्षेत्रात त्यांनी भरीव कामगीरी केली. अनेक संकटातून त्यांनी महाराष्ट्रला बाहेर काढले या सर्व योगदानामुळे नाईकांना आधूनिक महाराष्ट्राचा खरा शिल्पकार म्हणता येईल महाराष्ट्राने साध्य केलेली हरितक्रांती,धवलक्रांती,औद्योगीक क्रांती, सहकारक्रांती, कृषीक्रांती महाराष्ट्राच्या व शेतीच्या प्रगतीचे मापदंड आहेत.या सर्वांच्या पाठीमागे नाईक यांचे राजकीय योगदान असल्याचे दिसून येते. आज महाराष्ट्रत भयान चित्र आहे भुकेचा प्रश्न,पाणी टंचाई,शेतीसाठी ठोस निर्णय घेतले जात नाही. शेती अरिष्टात सापडली आहे. ग्रामिण भागातून माण्साचे लोंढे शहराकडे येतोय यावर उपाययोजना करून न्यायाची शाश्वती दिल्यास शहराकडे जाणारा लोंढा थांबवता येईल. उद्योगाप्रमाणेच कृर्षीक्षेत्र, प्रक्रिया उद्योग,वनशेती मत्स्यशेतीची गरज आहे. फक्त औद्योगीकरणावर मुलभूत गरजा भागविता येणार नाही. पुन्हा एकदा वसंतराव नाईक यांच्या दृष्टीने विचार करता महाराष्ट्रातील ग्रामिण शेती,माती, शेतक–यांच्या अनेक प्रश्नाची सोडवणूक करण्याची गरज आहे.

***संदर्भ :***

1 साप्ताहीक बंजारा पुकार दिनांक 30 जुलै 2007 वसंतराव नाईक यांची 94 वी जयंती विशेषांक पा. नं. 41

2 लोकराज्य वसंतवैभव जन्मशताब्दी विशेशांक डिसेंबर 2012 अंक 9 वा पा. नं. 57

3 कर्णिक मंगेश 'दुत पर्जण्याचा मुख्यमंत्री 'वर्षा ' संपादक प्राचार्य राठोड राजाराम वसंत प्रकाशन ,1980 औरंगाबाद पा. नं. 29

4कर्णिक मधु मंगेश मुख्यमंत्री कै वसंतरावजी नाईक यांचे चरित्र प्रकाशक नरेंद्र तिडके लोकमान्य टिळक मुंबई पां नं. 93

5 बंजारा एकता मासिक संपादक दिगंबर राठोड वर्ष 1ले अंक 13 वे 15 ऑगस्ट 2001 पा. नं 6

6 गोरवाणी– संपादक रमेश जाधव डिसेंबर 2009 पां नं 5

7 लोकराज्य वसंतवैभव जन्मशताब्दी विशेषांक डिसेंबर 2012 अंक 9वा पां नं 59

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net